**आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
DIRECTORATE OF AYURVED, MAHARASHTRA STATE, MUMBAI.
**शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
Government Dental Collage & Hospital Building, 4th Floor, St.George's Hospital Compound, P.D' mello Road, Fort, Mumbai - 400 001.
कायालय : दुरध्यवनी व फॅक्स - ०२२ २२६२६००७ संचालक : ०२२ - २२६२२२४७
ई-मेल : directorayurvedmaha@gmaii.com वेबसाईट : www.mahayush.gov.in

क्र.आसंमुं/शिबीर/सहभागी/२०११/आयु-२ दिनांक :-

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदाति आयुर्वेद महाविद्यालये

विषय :- आयुर्वेद टुडे ग्रुप च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 1st Ayurveda Today Conference & Arogya Expo या कार्यक्रमामध्ये सहभागी होणेबाबत.

आयुर्वेद चिकित्सा पध्दत ही एक महत्वाची व परिणामकारक उपचार पध्दती आहे. सदर उपचार पध्दतीचा वापर मोठया प्रमाणात महाराष्ट्र राज्यातील रुग्णांवर केल्याने आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार होणार आहे.

सदर बाब विचारात घेऊन आयुर्वेद टुडे ग्रुप च्या वतीने महाराष्ट्र शासन, आयुर्वेद टुडे ग्रुप, मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेसह दि.०९.१२.२०११ ते ११.१२.२०११ या कालावधीत एम.एम.आर.डी.ए.मैदान, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई येथे 1st Ayurveda Today Conference & Arogya Expo हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका या संचालनालयाची वेबसाईट www.mahayush.gov.in वर उपलब्ध करण्यात येत आहे.

यास्तव आपणांस सूचित करण्यात येते की, सदर कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील पाच अध्यापक, १० पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील प्रत्येकी दोन उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थी (अभ्यासक्रमातील गुणवत्ता क्रमांक १ व २) इत्यादींनी सक्तीने सहभागी व्हावयाचे आहे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये सहभागी होत असलेल्या पाच अध्यापक, १० पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील प्रत्येकी दोन उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थी (अभ्यासक्रमातील गुणवत्ता क्रमांक १ व २) इत्यादींना योग्य ते मार्गदर्शन व नियोजन करण्यासाठी महाविद्यालया ज्येष्ठ प्राध्यापकाची नियुक्ती करुन त्यांचेमार्फत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने चिकित्सालयीनसंबंधित सादर करावयाची कागदपत्रे atgindia.11@gmail.com या ई-मेल पत्त्यावर सादर करावीत.

तरी वर सूचित केल्याप्रमाणे प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास उलट टपाली कळविण्यात यावे.

( वैद्य कुलदीप राज कोहली )
संचालक,
आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत - वैद्य व्ही.पी.उखळकर, सहाय्यक प्राध्यापक, शासकीय आयुर्वेद महावद्यिालय, नांदेड.

आपणांस सूचित करण्यात येते की, विषयांकित कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिकेची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत असून सदर प्रत सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांच्या माहितीस्तव या संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.